**<u>ठळक बातम्या</u>**

- ब्रिक्स देशांकडून नवी दिल्ली जाहीरनामा एकमतानं स्वीकृत, जगाच्या विविध भागात सुरू असलेल्या युद्धांवर चिंता व्यक्त

- जागतिक व्यवस्थेचे नियम ठरवण्याचे अधिकार ग्लोबल साऊथमधल्या देशांनाही मिळावे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं ब्रिक्स देशांच्या प्रमुखांसमोर प्रतिपादन

- मंगळवारी मुंबईकडे निघून शनिवारपासून आझाद मैदानावर उपोषण करण्याचा मनोज जरांगे यांचा इशारा, गणेशोत्सवादरम्यान आंदोलन न करण्याचं सरकारचं आवाहन

**आणि**

- विविध राज्यातल्या भर्ती प्रक्रियेचा अभ्यास करुन सरकार MPSC ला अधिक सक्षम करणार

**<><><><><>**

ब्रिक्स देशांनी जगातल्या अनेक भागात सुरू असलेली युद्धं तसंच ध्रुवीकरण आणि विभाजनाच्या मुद्द्यावर चिंता व्यक्त केली आहे. नवी दिल्लीत आजपासून सुरू झालेल्या ब्रिक्स परिषदेत नवी दिल्ली जाहीरनाम्यावर सर्व देशांनी सहमती दर्शवली. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड कॅप्सूल - - -**

*(पश्चिम आशियात वाढत असलेला संघर्ष, पायाभूत सुविधांचं होणारं नुकसान, नागरी अणूऊर्जा प्रकल्पांवर होणारे हल्ले, शस्त्र खरेदीवर वाढत असलेला खर्च यावर ब्रिक्स देशांनी चिंता व्यक्त केली. पश्चिम आशियात दीर्घकालीन शांतता, सुरक्षा आणि स्थिरता प्रस्थापित व्हावी यासाठी चर्चा आणि मुत्सद्देगिरी अधिक प्रभावीपणे होण्याची गरज जाहीरनाम्यात व्यक्त केली आहे.*

*पॅलेस्टिनमधल्या नागरिकांचे अधिकार पूर्ण केल्याशिवाय इस्राइल-पॅलेस्टाइन संघर्षावर तोडगा निघू शकत नाही असं स्पष्ट उल्लेख जाहीरनाम्यात आहेत. गेल्यावर्षी पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्याचा या देशांनी कठोर शब्दात निषेध केला आणि सर्व प्रकारच्या दहशतवादावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्याची कटीबद्धता पुन्हा एकदा व्यक्त केली.*

*वित्तीय क्षेत्रात सहयोग वाढवतानाच जलद, स्वस्त, पारदर्शक पद्धतीने विविध देशांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना पैसे हस्तांतरित करता यावे यावर या देशांचं एकमत झालं. क्रीडा तंत्रज्ञान या विषयावर कृती दल तसंच क्रीडा साहित्य उत्पादन परिषदेचं आयोजन करण्याच्या भारताच्या प्रस्तावाला ब्रिक्स देशांनी या जाहिरनाम्याद्वारे सहमती दर्शवली आहे. ब्रिक्स देशांच्या जाहीरनाम्याविषयी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले.*

- ***- होल्ड - प्रधानमंत्री बाइट - - )***

- **<><><><><>**

जागतिक व्यवस्थेचे नियम ठरवण्याचे अधिकार ग्लोबल साऊथमधल्या देशांना मिळाले पाहिजेत. सर्वांचं भविष्य जर सामूहिक असेल तर ते ठरवण्याचे अधिकारही सामूहिक असायला हवेत, अशी मागणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केली. ब्रिक्स परिषदेच्या उद्घाटन सत्रात ते नवी दिल्लीत बोलत होते. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

- **- - होल्ड - कॅप्सूल - - -**

*(ब्रिक्स देशांनी इतरांनी बनवलेल्या नियमांचं पालन करताना नियम बनवणारे व्हावं. त्यामुळं तरुण मुत्सद्दी, धोरणनिर्माते यांना मुत्सद्देगिरी, प्रत्यक्ष अनुभव आणि कायद्यांचं ज्ञान देता येईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज म्हणाले. कृत्रिम बुद्धीमत्ता, सायबर तंत्रज्ञान, अंतराळ क्षेत्र, जैव तंत्रज्ञान आणि इतर महत्त्वाच्या तंत्रज्ञानातलं ब्रिक्स देशांचं योगदान त्यांनी यावेळी अधोरेखित केलं. जागतिक पातळीवरच्या संकटात ग्लोबल साऊथचे देश आघाडीवर असताना निर्णय घेण्यात मात्र त्यांना आघाडीचं स्थान मिळत नाही. त्यामुळं काही संपन्न देशांच्याच हातात निर्णय प्रक्रिया केंद्रीत ठेवण्याऐवजी सर्वसमावेशक पद्धतीनं, मानवतेच्या विकासासाठी काम व्हायला हवं असं ते म्हणाले.*

- *- - होल्ड बाइट १ - - -*

***( ब्रिक्स को मजबूत करते हुए, हमें global reform की दिशा भी तय करनी होगी। Global Governance का वर्तमान structure, एक pyramid जैसा दिखाई देता है। इसके ऊपरी भाग में power और decision making केंद्रित हैं, और निचले भाग में वे देश हैं जो इन decisions से प्रभावित तो होते हैं, लेकिन उन्हें आकार नहीं दे पाते।)***

*यासाठी त्यांनी १० प्रस्ताव सदस्य देशांसमोर मांडले. त्यात संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत जलदगतीने आणि निर्धारित कालमर्यादेत सुधारणा करण्याचा समावेश आहे.*

- ***- - होल्ड बाइट २ - - -***

***(financial institutions में voting power, leadership positions और policy priorities आज की इकोनॉमिक रियेलिटीज़ के अनुसार होनी चाहिए। जो देश global economic growth को गति देते हैं, उन्हें global economic governance को दिशा देने में भी उचित भूमिका मिलनी चाहिए।)***

*लोकांमध्ये विश्वास निर्माण व्हावा यासाठी जागतिक पातळीवर कार्यरत संस्थांनी वेगवान पद्धतीनं, मोठ्या प्रमाणात आणि तळागाळातल्या नागरिकांना मदत होईल, अशी पद्धतीनं काम करायला हवं, असं प्रधानमंत्री म्हणाले. तसंच दर्यावर्दींच्या कल्याणासाठी नवीन यंत्रणा स्थापन करण्याची कल्पना त्यांनी मांडली.*

- ***- - - होल्ड बाइट ३ - -- -***

***(मेरा प्रस्ताव है कि क्या हम Seafarers Emergency Support Network बना सकते हैं? इसके माध्यम से संबंधित देशों की Maritime authorities और missions को जोड़ा जाएगा। इससे distress alerts, medical assistance, परिवारों को सूचना तथा evacuation में सहयोग दिया जा सकता है।)***

*भारताची ब्रिक्स अध्यक्षता लोककेंद्री आणि मानवतेवर आधारित आहे. गेल्या २० वर्षात ब्रिक्स समूह एकता आणि सहमतीनं काम करत असल्याबद्दल त्यांनी कौतुक केलं. या क्षमतेच्या आधारे जागतिक पातळीवर मोठे बदल घडवून आणण्याची गरज त्यांनी ब्रिक्स देशांच्या प्रमुखांसमोर व्यक्त केली. तसंच ब्रिक्सदेशांमध्ये निर्णय सातत्य रहावं अशी अपेक्षाही व्यक्त केली.)*

**<><><><><>**

नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आजपासून सुरू झालेल्या या १८व्या ब्रिक्स शिखर परिषदेत ब्राझील, चीन, इजिप्त, इथिओपिया, इंडोनेशिया, भारत, इराण, रशिया, सौदी अरब, दक्षिण आफ्रिका आणि संयुक्त अरब अमिरात या जगातल्या प्रमुख देशांचे प्रमुख आणि प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. त्यात रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल रामाफोसा, इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फताह अल-

सिसी, इंडोनेशियाचे अध्यक्ष प्राबोवो सुबियांतो आणि इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान हे नेते सहभागी होणार आहेत. याशिवाय व्हिएतमानचे प्रधानमंत्री ले मिन्ह हुंग, बेलारुसचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मॅक्सिम राइजेनकोव आणि जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक डॉक्टर टेडरॉस घेब्रेसस यासाठी दिल्लीत दाखल झाले आहेत.

<><><><><>

येत्या मंगळवारी मुंबईच्या दिशेनं निघू आणि मराठा आरक्षणासाठी मुंबईच्या आझाद मैदानात पुढच्या शनिवारपासून बेमुदत उपोषणाला बसू, अशी घोषणा आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांनी आज आंतरवाली सराटी इथं केली. गणपतीची स्थापना करून मराठा समाजबांधवांनी मुंबईकडे निघावं, आणि पाटोदा, श्रीगोंदा, हडपसर, खोपोली आणि कौपरखैरणे असे मुक्काम करत मुंबईत पोहोचावं, असं आवाहन त्यांनी केलं. आंदोलकांनी दगडफेक किंवा जाळपोळ करू नये, सर्व नियम पाळावेत, लोकशाही मार्गाने आंदोलन करावं, तसंच सरकारनेही आंदोलकांच्या वाटेत अडथळे निर्माण करू नयेत, असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

गणेशोत्सवाच्या काळात आंदोलन करून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करू नका, असं आवाहन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं आहे. ते आज नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. राज्यसरकार मराठा समाजाला न्याय देण्याच्या दिशेनं काम करत आहे. आजवर मराठा समाजाला जो न्याय मिळाला, त्यातले महत्त्वाचे निर्णय देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात झाले आहेत, असं ते म्हणाले.

सध्या शेतकऱ्यांना दुष्काळाच्या काळात कशी मदत करता येईल, याला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असून शासनाच्या नियमावलीनुसार शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करण्याची सरकारची भूमिका आहे, असं ते म्हणाले. राज्यातल्या दुष्काळी परिस्थितीचा संपूर्ण आढावा घेतल्यानंतर तो आगामी मंत्रिमंडळ बैठकीत मांडण्यात येईल, असंही बावनकुळे यांनी सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यपद्धतीला अधिक बळकटी देऊन भरती प्रक्रिया उमेदवारांसाठी सुलभ, गतिमान आणि पारदर्शक करण्यावर भर देण्यात येणार आहे, अशी

माहिती सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी ही माहिती दिली. पुण्यात पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. त्यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय कृती दलानं आज पुण्यात विद्यार्थी, पालक आणि अन्य संबंधितांशी चर्चा केली. देशातल्या विविध राज्यांमध्ये राबवण्यात येणाऱ्या परीक्षा पद्धतींचा अभ्यास करून त्यातील उपयुक्त बाबींचा महाराष्ट्राच्या भरती प्रक्रियेत समावेश करण्याबाबत शासनाला शिफारशी करण्यात येणार असल्याचं राधा यांनी सांगितलं. या कृतीदलाकडे आतापर्यंत १८ हजारांपेक्षा अधिक इमेल आले आहेत.

<><><><><>

लातूर शहरात आज एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी विविध मागण्यांसाठी आक्रोश मोर्चा काढला. एमपीएससीच्या अध्यक्षांनी तत्काळ राजीनामा द्यावा, आगामी परीक्षा पारदर्शक पद्धतीनं घेण्यात याव्यात, तसंच विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांकडे सरकारनं गांभीर्यानं लक्ष द्यावं, या प्रमुख मागण्या विद्यार्थ्यांनी केल्या.

<><><><><>

जातनिहाय जनगणना करताना इतर मागासवर्गीयांसाठी वेगळा रकाना ठेवून प्रत्येक समाजघटकाची लोकसंख्या अधिकृतपणे नोंदवावी अशी मागणी काँग्रेसने केली आहे. ओबीसी समाजाची अचूक लोकसंख्या, सामाजिक - शैक्षणिक स्थिती आणि आर्थिक परिस्थितीची माहिती उपलब्ध झाली तर विविध कल्याणकारी योजनांचं नियोजन करता येईल, असं काँग्रेसचं म्हणणं आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने आज मुंबईत राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची भेट घेऊन मागण्याचं निवेदन सादर केलं. राज्याच्या विविध भागात पावसाअभावी दुष्काळी परिस्थिती उद्भवली असून तातडीनं राज्यात दुष्काळ जाहीर करावा, शेतकरी आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, जनावरांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था करावी अशी मागणीही काँग्रेसनं केली आहे.

<><><><><>

जन्मजात दुभंगलेले ओठ आणि टाळू या विकारानं ग्रस्त बालकांना सर्वसमावेशक उपचार मोफत उपलब्ध व्हावेत यासाठी राज्य सरकारनं एक करार केला आहे. या करारांतर्गत राज्यातल्या १५ मान्यताप्राप्त रुग्णालयांत या व्याधीवर उपचार केले जातील.

<><><><><>

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातल्या कमळेश्वर तालुक्यातल्या आदासा गणेश मंदिराला ब वर्ग यात्रास्थळाचा दर्जा द्यायचा निर्णय सरकारनं घेतला आहे. शमी विघ्नेश गणपती देवस्थान या नावानेही हे देवस्थान ओळखलं जातं.

//<><><><><>//